# फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये शपथेवर फिर्यादीचे सत्यापण

नि.**फौ.खटला क्र.३६३/२०२५**

समीर रज्जाक खाटीक वि असिफ बशीर मुल्ला

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र २

**निशानी क्र.०१ खाली**

**मी प्रतिज्ञापुर्वक सांगते की–**

माझे नांव – अझरुद्दीन खलील ईनामदार

वय – ३२ वर्ष, व्यवसाय – मजुरी

राहणार– रा. सांगली

**शपथेवर कथन करते की–**

०१ मी फिर्यादी व आरोपीस ओळखतो. फिर्यादीचा जूने चारचाकी वाहन खरेदी व विक्रीचा व्यवहार आहे. मी फिर्यादी व आरोपी यांच्या व्यवहारात साक्षीदार होतो. फिर्यादी व आरोपीमध्ये रुपये ४ लाख ८० हजार रुपयांचा व्यवहार झाला होता. त्यापैकी ३ लाख ४० हजार रोख रक्कम व १ लाख ४० हजार आरोपी क्र २ यांना ऑनलाईन दिले होते. फिर्यादीला दिलेली गाडी फायनान्स कंपनी चा आर्थिक बोजा असल्यामुळे घेवून गेले. फिर्यादीला पैशाच्या मोबदल्यात आरोपी क्र ३ यांनी पैसे नसल्यामुळे स्वताच्या नावाचे घर फिर्यादीला लिहून दिले होते. त्यावेळी मी हजर होतो. त्याचा दस्त दाखविल्यास मी ओळखू शकतो. त्यावर माझी सही आहे त्यावरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर आरोपी क्र ३ व फिर्यादीचीही सही आहे. नोटरी नोंद करणेत आली. सदर दस्तास निशाणी क्र ८ देण्यात येते. आरोपी क्र १ ते ३ यांनी फिर्यादीच्या ताब्यात घर दिले नाही.

(अझरुद्दीन खलील ईनामदार)

**सही/अंगठा**

मिरज

दि.०८.१२.२०२५

**[प्रविण उ. कुलकर्णी]**

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी न्यायालय क्र.२ मिरज.